# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.-४२२००२**

**दुरध्वनी क्रमांक:- ०२५३ २५७२०६२** **E mail ID- dir_swm@nmc.gov.in**

---

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० ची अंमलबजावणी व त्याअंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामे करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेत कंत्राटी तत्वावर नियुक्त करावयाच्या शहर समन्वयक (City Co-ordinator) पदाच्या नेमणूकीची जाहिरात.**

नाशिक महानगरपालिका, नाशिक घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० ची अंमलबजावणी व त्याअंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामे करण्यासाठी ०६ महिने कालावधीकरीता कंत्राटी तत्वावर नाशिक महानगरपालिकेत शहर समन्वयक (City Co-ordinator) पदाच्या नेमणूकीकरीता पात्र उमेदवारांकडून निम्न तपशिलानुसार अर्ज मागविणेत येत आहे.

**भरती करावयाच्या पदाची माहिती**

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | कंत्राटी मासिक मानधन र.रू. |
|---|---|---|---|
| १. | शहर समन्वयक (City Co-ordinator) | ०१ | ४५,०००/- |

अ) **अर्ज करण्याची पध्दती.**

१. उमेदवाराने अर्ज अचुक व परिपुर्ण स्वरूपात भरून आवश्यक कागदपत्रांसह बंद पाकिटात दिनांक १५/०२/२०२३ ते दिनांक २३/०२/२०२३ पावेतो कार्यालयीन वेळेत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) घनकचरा व्यवस्थापन विभाग (मुख्यालय), राजीव गांधी भवन मुख्यालय, नाशिक महानगरपालिका, शरणपूर रोड, नाशिक येथे समक्ष अथवा पोस्टाने सादर करावे. सार्वजनिक सुट्टीचे दिवशी कार्यालयात अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

२. अर्जाचा नमुना www.nmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्जाचा नमुना उमेदवाराने डाऊनलोड करून अर्ज परिपुर्ण व अचुक स्वरूपात भरून आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

३. अर्जाचा नमुना सोबत जोडलेला असून, सदर अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूस ठळक अक्षरात 'शहर समन्वयक (City Co-ordinator) पदासाठी अर्ज' असे नमुद करावे.

४. घनकचरा व्यवस्थापन विभाग (मुख्यालय), राजीव गांधी भवन मुख्यालय, नाशिक महानगरपालिका, शरणपूर रोड, नाशिक या कार्यालयात दिनांक २३/०२/२०२३ रोजी सायं.६.१५ वाजेनंतर अर्ज स्विकारणेत येणार नाही. तसेच, पोस्टाने दिनांक २३/०२/२०२३ पर्यंतचे सायंकाळी ६.१५ नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

आ) **'शहर समन्वयक (City Co-ordinator) पदासाठी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव व कामाचा कालावधी.**

१. मान्यता प्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेतील पदवी, १. बी.ई./बी.टेक.(कोणतीही शाखा), २. बी. आर्क ३. बी.प्लॅनिंग धारण केलेली असावी.

२. उमेदवारास मराठी/हिंदी/इंग्रजी या भाषांसोबतच संगणकीय ज्ञान आवश्यक आहे.

३. सदर पदाच्या पात्रतेकरीता उमेदवाराची वयोमर्यादा हि कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे राहील. तथापि, शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे इतकी शिथील केली जाईल.

४. सदर पदाच्या पात्रतेकरीता उमेदवारास स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे.

५. सदर पदावर निवड होणाऱ्या उमेदवारास दरमहा र.रू.४५,०००/- दरमहा एकत्रित मानधन दिले जाईल.

६. सदर पदावरील नियुक्ती हि तात्पुरत्या कंत्राटी स्वरूपात ०६ महिने कालावधीकरीता राहील. तद्नंतर आवश्यकता भासल्यास अथवा काम समाधानकारक असल्यास सदर नियुक्ती मा.स्थायी समितीचे मान्यतेने ०५ महिने कालावधीकरीता वाढविणेत येईल.

**इ) इतर अटीशर्ती**

१. सदर पदावरील नियुक्ती हि तात्पुरत्या कंत्राटी स्वरूपात ०६ महिने कालावधीकरीता असल्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या शहर समन्वयकांना नाशिक महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवर कायम करण्याचा हक्क राहणार नाही.

२. अशा प्रकारे निव्वळ कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात येणाऱ्या शहर समन्वयकांना कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत अथवा त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत.

३. काम करतांना कोणत्याही प्रकारचा अपघात / वित्तहानी/ जिवीत हानी झाल्यास अपघातासंबंधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयातकडून अनुज्ञेय राहणार नाही.

४. मुलाखतीअंती पात्र ठरलेल्या व अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्रांच्या अनुषंगाने रूजु होतांना मुळ कागदपत्रे सोबत आणणे अनिवार्य आहे.

५. सदर पदाकरीता पात्र उमेदवाराची निवड हि मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.

६. उमेदवारांनी अर्ज भरून त्यासोबत पासपोर्ट साईज २ फोटो, जन्म तारखेकरीता शाळा सोडल्याचा दाखला, फोटो आयडीकरीता आधारकार्ड / मतदान ओळखपत्र, आयडी कार्ड, पॅन्कार्ड, शैक्षणिक अर्हताकामी पदवी परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका, अनुभव दाखला इ.च्या साक्षांकित सत्यप्रती सादर करणे आवश्यक राहील. तसेच, मुलाखतीस पात्र ठरविल्यास त्यावेळी या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सादर करणे बंधनकारक राहील.

७. नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर रूजु अहवाल मा.आयुक्त तथा प्रशासक, नाशिक महानगरपालिका यांचेकडे त्वरीत सादर करणे अनिवार्य आहे.

८. निवड झालेल्या उमेदवारास संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, महानगरपालिका नाशिक यांचे अधिपत्याखाली कामकाज करावे लागेल. सदरचे कामकाज करतांना कार्यालयीन कामकाजाची निर्धारीत वेळ बंधनकारक राहील. तसेच, करीत असलेल्या कामकाजाचा अहवाल अद्ययावत स्वरूपात ठेवून मागणी केलेनुसार संबंधितांकडे सादर करावा.

९. सदर पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांना नाशिक महानगरपालिका, नाशिक घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.०, स्वच्छ सर्वेक्षणची अंमलबजावणी व त्याअंतर्गत घेण्यात येणारी विविध कामे करणे बंधनकारक राहील.

१०. सदर पदाचे कामकाज करतांना वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार तसेच, मा.केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवेळीचे मार्गदर्शक सुचना/निर्देश यानुसार काम करणे बंधनकारक असेल.

११. नियुक्ती केलेल्या उमेदवाराने कामकाज करतांना प्राप्त होणारी कागदपत्रे, दस्तऐवज, माहिती व आधार सामुग्री इ.बाबत गोपनियता बाळगणे बंधनकारक राहील.

१२. सदर पदाच्या नियुक्तीकरीता उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे राजकीय दबाव आणल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१३. उमेदवार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. तसेच, त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. गुन्हा दाखल झाल्याचे निदर्शनास आल्यास पुर्वसुचना अथवा कारण न देता सदरची नियुक्ती तात्काळ रद्द करणेत येईल.

१४. नियुक्त केलेल्या उमेदवाराचे कामकाज असमाधानकारक असल्यास कोणतेही कारण न देता सदरची नियुक्ती वेळेपुर्वी रद्द करणेचे अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे असतील.

१५. सदरहू जाहिरातीत बदल करणे, भरती प्रकिया स्थगित करणे, रद्द करणे अथवा प्रक्रियेत बदल करणे इ.बाबतचे सर्वाधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी राखून ठेवलेले आहे.

Sd/-
**आयुक्त,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

## शहर समन्वयक (City Co-ordinator) पदासाठी अर्जाचा नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी | | |
|---|---|---|
| १. | अर्ज क्रमांक | |
| २. | अर्ज स्विकारल्याचा दिनांक | |
| ३. | अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) | |

**सुचना**:- १. अर्जातील अंक मराठीत लिहावे.
२. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व जेथे आवश्यक आहे त्या ठिकाणी इंग्रजीत असावी.

### अर्जदाराची माहिती

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव

| अर्जदाराचे संपुर्ण नाव | आडनाव | नाव | वडीलांचे / पतीचे नाव |
|---|---|---|---|
| मराठी | | | |
| इंग्रजी | | | |

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता
---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

३) दुरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक -------------------------------------- ई मेल आयडी ---------------------------------------------
४) जन्म दिनांक (अंकात) ----------------------- (अक्षरात) ----------------------------------------------------------------
५) जाहिरातीच्या दिनांकास वय -------- वर्षे ------------------ महिने ----------------- दिवस -------------------------
६) लिंग पुरूष/महिला
७) जात --------------------------------------------- प्रवर्ग ----------------------------------------------
८) धर्म ------------------------------- राष्ट्रीयत्व -----------------------------------------------------
९) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहे काय ? होय/नाही
१०) अवगत असलेल्या भाषा मराठी / हिंदी / इंग्रजी
११) शैक्षणिक अर्हता

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव विद्यालय/महाविद्यालय | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| पदवी | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | |
| संगणकीय अर्हता | | | | | |
| इतर | | | | | |

१२) अर्जदाराची इतर माहिती ---------------------------------------------------------------------------------------------------
१३) उमेदवाराने कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? होय/नाही
१४) पुर्वीच्या कामाचा/अनुभवाचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेतील पद्नाम | कामाचे स्वरूप | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

१५) अर्जदारांविरूध्द यापुर्वी कोणताही दखलपात्र अथवा अदखलपात्र गुन्हा दाखल आहे काय ? होय/नाही

### अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीम./कु------------------------------------------------------------------------ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहिर करीतो/करीते की, वरील माहिती जाणीवपुर्वक व विश्वासपुर्वक नमुद केलेली असून ती सत्य आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतानुसार मी सदर पदाकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी, असत्य आढळून आल्यास माझा अर्ज बाद केल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास माझी काही एक तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील व त्याबाबत माझेविरूध्द कायदेशीर कार्यवाहीस मी जबाबदार राहील. तसेच, भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास सदर भरती प्रक्रियेस मी अपात्र ठरेल. जाहिरातीतील अटीशर्ती मी वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :- / /२०२३ अर्जदाराची स्वाक्षरी ------------------------------
ठिकाण :- ------------------ अर्जदाराचे संपुर्ण नाव ------------------------------

सोबत अर्जात नमुद केलेल्या बाबी, आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित छायांकित सत्यप्रती जोडलेल्या आहेत.